| CNR-MHAK080003252026 | किरकोळ दि. अर्ज क्र.४३/२०२६<br>वर्षा व इतर ..वि.. निरंक |
|---|---|

**<u>निशानी क्रमांक ०१ वरील आदेश</u>**

**<u>(आदेश दिनांक १५.०४.२०२६)</u>**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेगुलेशन अधिनीयम १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे करीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे संक्षिप्त कथन असे की, मयत **निर्मला विठ्ठल नानोटे** यांचे अर्जदार क्र.१ ते ३ या विवाहीत मुली आहेत. मयत **निर्मला विठ्ठल नानोटे** यांचा मृत्यू **दि.२९.०३.२०२४** रोजी मौजा उजळेश्वर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला येथे झाला आहे. तसेच मयत **निर्मला विठ्ठल नानोटे** यांचे आई–वडील व पती हे बरेच वर्षापूर्वी मृत्यू पावले आहेत. त्यामुळे मयत **निर्मला विठ्ठल नानोटे** यांना अर्जदारां व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांनी मयताचा वारस दाखला कार्यालयीन कामाकरीता मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

३. अर्जदारांच्या विनंतीस कोणाचा आक्षेप आहे का याबाबत न्यायालयाच्या आदेशान्वये अर्जदार यांनी यादी **नि.क्र.८** नुसार दिनांक १३.०३.२०२६ रोजी **नि.क्र.१०** वर '**<u>अकोला दर्शन</u>**' वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटण प्रसिध्द करण्यात आले. परंतु आज पर्यंत सदर प्रकरणामध्ये कोणाचाही आक्षेप/उजर प्राप्त झाला नाही. तसेच जाहिर नोटीस **नि.क्र.०६** वर दाखल आहे.

४. प्रस्तुत अर्जामधील कथनांच्या पृष्ठयार्थ अर्जदार क्र.१ वर्षा राधेशाम खांबलकर यांनी **<u>नि.क्र.११</u>** वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदारांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात अर्जातील कथनांचा तंतोतंत समावेश केला आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या यादी नुसार **<u>नि.क्र.४</u>** नुसार मयत निर्मला विठ्ठल नानोटे यांची **नि.क्र.१४** वर मृत्यू प्रमाणपत्राची पडताळीत प्रत व **नि.क्र.१६** वर आधारकार्डची पडताळीत प्रत, तसेच

यादी **<u>नि.क्र.४</u>** नुसार **नि.क्र.१३, १५ व १९** वर त्यांच्या आधारकार्डच्या पडताळीत प्रती दाखल केलेल्या आहेत. तसेच पुरावा बंद पुरसिस **नि.क्र.२१** वर दाखल केली आहे.

**५.** अर्जदारांच्या पुराव्यास कोणीही आवाहन दिलेले नसल्यामुळे अर्जातील कथनावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता तसेच अद्याप कोणाचा आक्षेप नसल्यामुळे वरील अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे ग्राह्य धरण्यास हरकत नाही. तसेच अर्जदारांचे मयताशी असलेले नाते संबंध विचारात घेता, वरील सर्व अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. तसेच त्यांना औपचारीक मान्यता देण्यास बाधा नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचीत आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ वर्षा राधेशाम खांबलकर, अर्जदार क्र.२ पुष्पा दिलीप काळे व अर्जदार क्र.३ मेघाताई राजेश नंदापुरे हे मयत **निर्मला विठ्ठल नानोटे** रा. उजळेश्वर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला यांचे वारस असल्याचे घोषित करण्यात येते व सदरचा वारसा दाखला देण्यात येतो.

३. दिवाणी पुस्तीका प्रकरण क्र. १४ मधील परीच्छेद क्रमांक ३१२ अन्वये मुळ वारस प्रमाणपत्रावर टिप नमुद करावी.

४. अर्जदार यांना आवश्यक मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर ).

स्वा/-

दिनांक – १५.०४.२०२६

(एम. के. कुरे)
दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर,
बार्शिटाकळी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Steno | S. E. Nath |
| Name of the Court | CJJD & JMFC, Barshitakli, |
| Date of Order & Judgment | 15.04.2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. on | 15.04.2026 |
| Order/Judgment uploaded on | 15.04.2026 |